# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:21.05.2026** **वारः गुरुवार**

---

1. युक्रेन, पश्चिम आशिया आणि इतर तणावांच्या संदर्भात सर्व समस्या संवाद आणि मुत्सद्देगिरीद्वारे सोडविण्याची गरज-पंतप्रधान नरेंद्र मोदी
2. अणुऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनाचं नेतृत्व करण्यास महाराष्ट्र तयार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन
3. भारत-बांगलादेश सीमेवर काटेरी कुंपण उभारण्यासाठी सीमा सुरक्षा दलाकडे जमीन हस्तांतरित करण्यास सुरुवात आणि
4. 'NEET' पेपरफुटी प्रकरणातील पाच आरोपींना 2 जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी

**<u>मोदी इटली दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या पाच देशांच्या अधिकृत दौऱ्याचा अंतिम टप्पा असलेल्या इटलीचा दौरा यशस्वीरित्या पूर्ण करून काल नवी दिल्लीत परतले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली. या दौऱ्यात भारत आणि इटलीने आपले संबंध विशेष सामरिक भागीदारीपर्यंत वाढवण्याची घोषणा करण्याबरोबरच व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, संरक्षण, स्वच्छ ऊर्जा आणि धोरणात्मक भागीदारी या क्षेत्रांमधील सहकार्य वाढविण्यावर या बैठकीत भर देण्यात आला. त्याचबरोबर दोन्ही देशांनी कृषी, महत्त्वपूर्ण खनिजे, आयुर्वेद, विज्ञान आणि तंत्रज्ञान, तसेच भारतीय परिचारिकांना भारतातून इटलीमध्ये ये-जा करण्यासाठी सुविधा देण्यासह कर गुन्हे, बेकायदेशीर आर्थिक देवाण-घेवाण आणि दहशतवादी वित्तपुरवठा रोखण्याच्या मुद्द्यावरदेखील सामंजस्य करारांवरही स्वाक्षरी केली.

युक्रेन, पश्चिम आशिया आणि इतर तणावांच्या संदर्भात सर्व समस्या संवाद आणि मुत्सद्देगिरीद्वारे सोडवल्या पाहिजेत अशी भारताची भूमिका असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. तर दोन्ही देश प्रगत उत्पादन, पायाभूत सुविधा, ऊर्जा, अवकाश अर्थव्यवस्था आणि संरक्षण यावर कठोर परिश्रम करत असल्याचं मेलोनी यांनी म्हटलं आहे.

दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रोम इथं अन्न आणि कृषी संघटनेच्या मुख्यालयात प्रतिष्ठेचे 'ॲग्रिकोला पदक' प्रदान करण्यात आले. मोदी यांनी हा सन्मान भारतातील शेतकरी, पशुपालक, मत्स्यशेती करणारे बांधव, कृषी शास्त्रज्ञ आणि कामगारांना समर्पित केला. या प्रसंगी बोलताना पंतप्रधानांनी सांगितले की अन्न सुरक्षा हा केवळ धोरणात्मक विषय नसून, ती मानवतेप्रती जबाबदारी आहे. या सन्मानाबद्दल गृहमंत्री अमित शहा, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मोदी यांचं अभिनंदन केलं आहे.

**<u>अणुऊर्जा</u>**

महाराष्ट्र अणुऊर्जा क्षेत्रातील परिवर्तनाचं नेतृत्व करण्यास तयार असून अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. 'यू एस न्यूक्लिअर एक्झिक्यूटिव्ह मिशन इन इंडिया' अंतर्गत आयोजित अणुऊर्जा संस्था आणि अमेरिका आणि भारत यांच्यातील धोरणात्मक भागीदारी मंचाच्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते.

भारताच्या अणुऊर्जा क्षेत्राच्या पुढील प्रवासात महाराष्ट्र केंद्रस्थानी ठरणार असून महाराष्ट्राला केवळ आयात केलेल्या अणुभट्ट्यांचा ग्राहक म्हणून नव्हे, तर अणु उत्पादन, तंत्रज्ञान भागीदारी आणि जागतिक निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्याचा निर्धार आहे. यासाठी राज्याकडे सक्षम औद्योगिक यंत्रणा, जागतिक दर्जाची बंदरे, वाहतूक सुविधा, तांत्रिक कौशल्य असलेले मनुष्यबळ, अभियांत्रिकी क्षमता आणि उद्योगपूरक धोरणे उपलब्ध असल्याचं फडणवीस यांनी नमूद केलं.

अमेरिकन कंपन्यांनी महाराष्ट्रात अणुऊर्जा उत्पादन आणि प्रकल्प उभारणीसाठी पुढाकार घेतल्यास राज्य सरकारकडून औद्योगिक जमीन, पायाभूत सुविधा, कौशल्य विकास, संशोधन सहकार्य आणि उत्पादन क्लस्टर उभारणीसाठी मदत केली जाईल, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.

या बैठकीस ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्यासह अनेक विभागांचे सचिव, सल्लागार, अमेरिकेतील न्यूक्लिअर एनर्जी इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मारिया ग्रेस कोर्सनिक, विविध अमेरिकन कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी, अमेरिका-भारत धोरणात्मक भागीदारी मंचाच्या व्यवस्थापकीय संचालक निवेदिता मेहरा, अनेक कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ, औद्योगिक तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळी असल्यानं इथं गुंतवणुकीची मोठी संधी असल्याचं मारिया कोर्सनिक यांनी नमूद केलं.

**BRICS**

मध्यप्रदेशातील इंदूर इथं काल दोन दिवसीय 'ब्रिक्स' युवा उद्योजकता कार्यगटाच्या बैठकीला सुरुवात झाली आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भारत भूषवत आहे. 'लवचिकता, नावीन्य, सहकार्य आणि शाश्वतता यासाठी उभारणी' अशी या बैठकीची मध्यवर्ती संकल्पना आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने या बैठकीचे आयोजन केलं आहे. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा निखिल खडसे यांनी पहिल्या सत्राचे उद्घाटन केले. 'ब्रिक्स' सदस्य देशांमधील तरुण उद्योजक आणि प्रतिनिधी आपल्या 'स्टार्टअप' कल्पना, तसेच व्यवसाय करण्याच्या नवनवीन पद्धतींची देवाणघेवाण करत आहेत. या बैठकीमध्ये डिजिटल कल्पना, सर्वसमावेशकता आणि दीर्घकालीन विकास या विषयांवरही विशेष सत्रे आयोजित केली जाणार आहेत.

**राजनाथ सिंह**

भारत कोणत्याही स्वरूपाचा दहशतवाद खपवून घेणार नसल्याचा पुनरुच्चार संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी केला आहे. राजनाथसिंह दक्षिण कोरियाच्या दौऱ्यावर असून भारतीय समुदायाशी संवाद साधताना ते काल बोलत होते. भारत आपल्या 'प्रथम वापर न करण्याच्या' धोरणाशी कटिबद्ध असला, तरी तो कोणत्याही प्रकारची अण्वस्त्र वापरण्याची धमकी भारत सहन करणार नाही असल्याचं राजनाथसिंह यांनी म्हटलं आहे. संरक्षण उत्पादनाच्या क्षेत्रात आत्मनिर्भरता साध्य करण्यास सरकार कटिबद्ध असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. पुढील एक ते दोन वर्षांत संरक्षण निर्यातीचा आकडा 50 हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे, तर संरक्षण उत्पादन पुढील काही महिन्यांत एक लाख पंच्याहत्तर हजार कोटी रुपयांपर्यंत वाढण्याचा अंदाज असल्याचं रजनाथसिंह यांनी म्हटलं आहे.

**WB-BSFLAND**

पश्चिम बंगाल सरकारने भारत-बांगलादेश सीमेवर काटेरी कुंपण उभारण्यासाठी सीमा सुरक्षा दलाकडे जमीन हस्तांतरित करण्यास सुरुवात केली आहे. काल 'नबन्ना' इथं मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांनी BSF अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या प्रक्रियेला सुरुवात केली. घुसखोरी, तस्करी, बनावट चलन, सक्तीचे धर्मांतर आणि बेकायदेशीरपणे प्रवेश करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांशी संबंधित गुन्हे यांसारख्या समस्यांचा संदर्भ देत, सीमेवर कुंपण उभारणे हे राष्ट्रीय आणि राज्याच्या सुरक्षेसाठी महत्त्वाचे असल्याचं अधिकारी यांनी यावेळी सांगितलं.

दरम्यान पश्चिम बंगालमध्ये काल CAA अर्थात नागरिकत्व दुरुस्ती कायद्याअंतर्गत, बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांना हद्दपार करण्याची प्रक्रिया सुरू करण्याची घोषणा अधिकारी यांनी केली आहे. CAA अंतर्गत संरक्षण मिळालेल्या सात समुदायांच्या सदस्यांवर कोणतीही कारवाई केली जाणार नाही; मात्र यासाठी त्यांनी 31 डिसेंबर 2024 पूर्वी भारतात प्रवेश केलेला असणे आवश्यक असल्याचं अधिकारी यांनी म्हटलं आहे.

**तुटवडा**

महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेलचा कोणताही तुटवडा नसून गरजेच्या प्रमाणात इंधनसाठा उपलब्ध असल्याचा मुख्यमंत्र्यांनी पुनरुच्चार केला. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवून गरजेपेक्षा जास्त इंधन भरण्याचा प्रयत्न केल्यास पुरवठा

साखळी विस्कळीत होते त्यामुळे इंधनाचा काटकसरीने वापर करण्याचं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं. फडणवीस यांनी काल मुंबईत विविध मुद्द्यांवर पत्रकारांशी संवाद साधला.

**<u>बंगाल निवडणूक</u>**

पश्चिम बंगालमधील दक्षिण 24 परगणा जिल्ह्यातील 'फल्टा' विधानसभा मतदारसंघात आज फेरमतदान होत आहे. मतदानाला सकाळी 7 वाजता सुरुवात झाली असून सायंकाळी 6 वाजता संपणार आहे. दोन अपक्ष उमेदवारांसह एकंदर सहा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तृणमूल काँग्रेसचे उमेदवार जहांगीर खान यांनी आपण ही निवडणूक लढवणार नसल्याचे जाहीर केले आहे; तथापि, उमेदवारी मागे घेण्याची मुदत यापूर्वीच संपल्यामुळे, मतपत्रिकेवर त्यांचे नाव औपचारिकरित्या कायम आहे.

देवांशू पांडा हे भाजपचे उमेदवार असून काँग्रेसने अब्दुर रज्जाक मोल्ला यांना उमेदवारी दिली आहे, तर सीपीआयएमने शंभू नाथ कुर्मी यांना निवडणुकीच्या मैदानात उतरवले आहे.

**<u>प्रधान</u>**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल Meta, Google आणि Telegram यांसारख्या प्रमुख समाज माध्यमांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी स्पर्धा परीक्षांशी संबंधित चुकीच्या माहितीचा वाढता प्रसार आणि निनावी ऑनलाइन समूहांच्या माध्यमातून होणारा प्रसार याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली. 21 जून रोजी होणाऱ्या नीट पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्वाची मानली जात आहे.

**<u>NEET-CUSTODY</u>**

दिल्लीतील एका न्यायालयाने 'NEET' पेपरफुटी प्रकरणातील पाच आरोपींना 2 जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी दिली आहे. या आरोपींमध्ये महाराष्ट्रातील धनंजय लोखंडे याचाही समावेश आहे. तर शुभम खैरनार याच्या सीबीआय  कोठडीत वाढ केली आहे.

**<u>MANGOFESTIVAL</u>**

छत्तीसगडमधील रायपूर इथं 29 ते 31 मे या कालावधीत 'राष्ट्रीय आंबा महोत्सव' आयोजित केला जाणार आहे. इंदिरा गांधी कृषी विद्यापीठाच्या आवारात होणाऱ्या या महोत्सवात आंब्याच्या 250 हून अधिक जातींचे प्रदर्शन मांडले जाईल. या कार्यक्रमादरम्यान आंब्याच्या विविध जातींच्या स्पर्धाही आयोजित केल्या जातील, ज्यामध्ये छत्तीसगड आणि इतर विविध राज्यांमधील आंबा उत्पादक सहभागी होतील.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागाने आज उत्तरेतील बहुतांश राज्यात उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. तर पुढील दोन दिवसांत ओडिशा, उत्तर प्रदेश आणि विदर्भ या भागांत रात्रीचे तापमानही सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.तर अंदमान आणि निकोबार बेटे, आसाम, मेघालय, केरळ, दक्षिण अंतर्गत कर्नाटक, पश्चिम बंगाल आणि सिक्कीम या भागांत आज मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे.

**या बरोबरच राष्ट्रीय बातमीपत्र संपलं ,**

**नमस्कार.**